# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

**(Govt. of Maharashtra Undertaking)**


जा. क्र. मप्राशिप/सशिअ/शिक्षक वेतन/२०१७-१८/२३७० दिनांक : 21 JUN 2017

**विषय: सर्व शिक्षा अभियानांतर्गत मंजूर शिक्षकांच्या वेतनाच्या प्रतिपूर्ततेबाबत.**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थी शिक्षक प्रमाण राखण्यासाठी, नवीन प्राथमिक शाळा, उच्च प्राथमिक शाळा, वस्तीशाळांचे नवीन प्राथमिक शाळेत रूपांतरण यासाठी भारत सरकारने वेळोवेळी शिक्षकांची पदे व त्यासाठी वेतनाची तरतूद मंजूर केली आहे.

राज्य शासनाकडून शिक्षकांना वेतन अदा केले जाते. सर्व शिक्षा अभियानांतर्गत मंजूर असलेल्या शिक्षकांच्या पदांनाही राज्य शासनाकडून वेतन दिले जाते. त्यामुळे सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २०१७-१८ मध्ये अंदाजपत्रकात नमूद केल्याप्रमाणे १४,९४० प्राथमिक शिक्षक व ४४७ उच्च प्राथमिक शिक्षकांच्या वेतनासाठी मंजूर असलेली एकूण तरतूद राज्य शासनाकडे प्रतिपूर्तीद्वारे या कार्यालयाकडून भरणा करण्यात येणार आहे. त्यामुळे आपल्या जिल्हा परिषद / महानगरपालिकेसाठी वरील विषयाच्या अनुषंगाने मंजूर तरतुदीचा विनियोग आपल्या स्तरावरून करण्यात येऊ नये. या उपक्रमांतर्गत खर्च झाल्यास तो ग्राह्य धरला जाणार नाही याची नोंद घ्यावी. जिल्ह्यांसाठी मंजूर आर्थिक तरतूद वित्तीय अंदाजपत्रकामध्ये नमूद केली आहे. या तरतुदीचा राज्य शासनाकडे भरणा केल्यानंतर जे.व्ही. द्वारे खर्च सर्व जिल्हा परिषदांना या कार्यालयाद्वारे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

(नंद कुमार भा.प्र.से.)
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२) आयुक्त, महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रत : माहितीस्तव,**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,**

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
४) शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद (सर्व).
५) प्रशासन अधिकारी, महानगरपालिका, अहमदनगर.





Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com